**प्रेस नोट दि.२९/०१/२०२५**

**गुन्हे शाखेने कर्नाटकातील घरफोडी चोरी करणा-या आरोपीस अटक करून ०५ गुन्हे उघडकीस आणुन ८६.७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम रू.१५,०००/- असा केले हस्तगत.**

---

दि.२६/०१/२०२५ रोजी, स.पो.नि. संदिप पाटील यांचे पथकास सोहेल किरेसुर, रा. बागलकोट, कर्नाटक सद्या- रेल्वे स्टेशन सोलापूर याचेकडे चोरीचे सोने व त्याने मे-२०२३ मध्ये राजस्व नगर, विजापूर रोड, सोलापूर येथे दिवसा घरफोडी चोरी केल्याची व तो सद्या- होम मैदान जवळील ज्ञान प्रबोधनी शाळेच्या बाजूचे रोडवर थांबला असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली, त्यानुसार स.पो.नि. संदिप पाटील व त्याचे पथकाने इसम नामे-**सोहेल नुरअहमद किरेसुर, वय-२५ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. पोस्ट ऑफीसचे मागे, स्टेशन रोड, बागलकोट, कर्नाटक, सद्या- रेल्वे स्टेशन, सोलापूर** यास ताब्यात घेवुन, त्याची अंगझडती घेतली असता त्यांचे बॅग मध्ये ३०.७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम रू.१५०००/- मिळुन आली.

त्या बाबत त्याचेकडे विचारपूस केली असता, त्याने प्रथम उडवा-उडवीचे उत्तरे दिली. परंतु त्यांचेकडे स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे पथकाने, कौशल्यपुर्वक तपास केला असता, त्यानी जानेवारी-२०२५ या महिन्यात सोलापूर शहरात ०३ घरफोडी चोरीचे, नोव्हेंबर-२०२४ मध्ये ०१ उघड्या घरातील चोरीचा गुन्हा केल्याचे कबुल केले. तसेच त्याने मे-२०२३ मध्ये राजस्व नगर येथे दिवसा घरफोडी चोरी केल्याचे देखील कबुल करून, सदर चोरीतील ५६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, रेल्वे स्टेशन जवळील दुकानदाराकडे नंतर घेवुन जातो म्हणून ठेवले असल्याचे सांगुन काढुन दिले आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे ०५ गुन्ह्यातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुरनं / कलम | जप्त मालाचे वर्णन |
|---|---|---|---|
| १ | विजापूर नाका | गुरनं-२४४/२०२३ भादंवि-४५४,३८० | ५६ ग्रॅम सोने |
| २ | जेलरोड | गुरनं-५२१/२०२४ भान्यासंक-३०५ | १० ग्रॅम सोने |
| ३ | सलगर वस्ती | गुरनं-०७/२०२५ भान्यासंक-३३१(३),३३१(४)३०५ | १२ ग्रॅम सोने |
| ४ | एमआयडीसी | गुरनं-११/२०२५ भान्यासंक-३३१(४),३०५ | रू.१५०००/- रोख रक्कम |
| ५ | सदर बझार | गुरनं-१४/२०२५ भान्यासंक-३३१(३),३३१(४)३०५(ए) | ८.७ ग्रॅम सोने |

वरील प्रमाणे, **घरफाडी चोरीचे-०४ व उघड्या घरातील चोरीचा-०१ असे एकुण-०५ गुन्हे** उघडकीस आणुन त्यामधील सुमारे **८६.७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे व रोख रक्कम रू.१५०००/-** असा एकुण **रू.३,०१,२००/-** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा इसम हा रेल्वे स्टेशन परिसरात वास्तव्य करून बंद घराची पाहणी करून घरफोडी चो-या करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगीरी, मा. श्री. एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, मा. डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, मा. राजन माने, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सोलापूर शहर, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि. संदिप पाटील, व पोलीस अंमलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, निलोफर तांबोळी, योगेश सावंत, चालक सतिश काटे, बाळासाहेब काळे सायबर पो.स्टे. कडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड, यांनी केली आहे.

२९/१

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**करीता**